डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना. सन २०१९-२० मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा व शिक्षणाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांना प्रशासकीय कार्यवाहीच्या खर्चासाठी रू.४०,०००/- इतका निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : अविवि-२०१९/प्र.क्र.५२/का-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९

वाचा :

१. शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१०/प्र.क्र.१५२/१०/का-६, दि.११ ऑक्टोंबर, २०१३
२. जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांचे पत्र क्र.कावि/ अका/अल्पसंख्यांक कक्ष /७१/२०१९, दि. २८ फेब्रुवारी, २०१९ व दि.१५ मार्च, २०१९
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) शिक्षणविभाग कार्यालय, जिल्हा परिषद बुलढाणा, यांचे पत्र जावक क्रमांक बुजिप/शिमा/विकास-१/८७२/२०१९, दि.१६ फेब्रुवारी, २०१९

प्रस्तावना :

मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दु या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, १० वी, ११वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होऊन त्यांची रोजगार क्षमता वाढून आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल, याद्दष्टीने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांना मानधनासाठी अनुदान देण्याची डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यास शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१० / प्र.क्र.१५२ / १० / का-६, दि.११ ऑक्टोंबर, २०१३ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. सदर योजनेसाठी सन २०१८-१९ करीता रूपये ०८.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक .अर्थसं-२०१८ / प्र.क्र.६९ / अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये मार्च, २०१९ अखेर पर्यंत सदर योजनेंतर्गत अर्थसंकल्पित वार्षिक तरतुदीच्या ८०% म्हणजे रू. ६.४० कोटी इतका निधी उपलब्ध होता. त्यामधून मार्च अखेर रू. ५.१७ कोटी इतका निधी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मदरशांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. शासन निर्णय क्रमांक : अविवि - २०१० / प्र.क्र. १५२/१०/का-६, दि. ११ ऑक्टोबर २०१३ मध्ये डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेंतर्गत मदरशांना पायाभूत सुविधांसाठी व ग्रंथालयासाठी अनुदान मिळण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करणाऱ्या जिल्हयांना सदर योजनेच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या खर्चासाठी सदर शासन निर्णयामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकरीता रू. २०,०००/- आणि शिक्षणाधिकारी कार्यालयाकरीता रू. २०,०००/- या प्रमाणे रू. ४०,०००/- संबंधित जिल्हाधिकारी यांना अनुज्ञेय राहील, असे नमूद करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सन २०१९-२० मध्ये मदरशांना वाटप करण्यासाठी रुपये ४.८० कोटी डिसेंबर, २०१९ पर्यतच्या ९ महिन्याच्या खर्चासाठी उपलब्ध आहे. सदर रूपये ४.८० कोटी इतक्या तरतुदीमधून सदर योजनेच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या खर्चासाठी जिल्हाधिकारी बुलढाणा कार्यालयाकरीता अनुदान वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. राज्यातील नोंदणीकृत मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना दिनांक ११ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार सदर शासन निर्णयातील प्रशासकीय कार्यवाहीच्या खर्चासाठी द्यावयाच्या अनुदानाच्या तरतुदीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्याकरीता रू. २०,०००/- आणि शिक्षणाधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्याकरीता रू. २०,०००/- या प्रमाणे रू. ४०,०००/- इतका निधी वितरीत करण्यासाठी याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेले अनुदान जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे सूपूर्द करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या सदर निधीच्या मर्यादेत अनुदानाचे अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीतून (BDS) आहरित व संवितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. याकरिता जिल्हाधिकारी, बुलढाणा नियंत्रक अधिकारी हे त्यांच्या कार्यालयातील योग्य त्या अधिकाऱ्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करतील.

३. अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा तसेच शिक्षणाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांनी अनुदान प्रत्यक्ष खर्च झाल्यानंतर अनुदानाच्या विनियोगाचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र शासनास आणि संबंधीत महालेखापाल कार्यालय यांना सादर करणे बंधनकारक आहे. जिल्हाधिकारी यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.एयुडी-१०८२/सीआर-९०/८४/ कोष-५, दि. २४ सप्टेंबर, १९८६ नुसार सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ घालून त्याचा अहवालही शासनास सादर करावा. तसेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचा संबंधित लेखाशिर्षाचा विनियोजन लेखा अहवाल दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत शासनास निश्चितपणे सादर करावा.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्रमांक.झेड ई-१, प्रधान लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण २००, इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (३१) राज्यातील नोंदणीकृत मदरशांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी आणि शिक्षकांना वेतनासाठी सहायक अनुदान (२२३५ बी २२७) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ अन्वये या योजनेकरीता उपलब्ध करण्यात आलेला रूपये ४.८० कोटी निधी डिसेंबर, २०१९ पर्यंत खर्च करण्यास उपलब्ध आहे. या तरतुदीतून चालू आर्थिक वर्षासाठी प्राप्त झालेला निधी वितरीत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र-१००८/प्र.क्र.७०/२००८/विनियम दि.१५.०५.२००९, अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत / विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियमपुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. या निधी वितरणासाठी शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक-अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९ / अर्थ-३, दिनांक २.४.२०१८ मधील अटींची पूर्तता होत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१९१६३६१६९७१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.08.20 11:29:24 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
५. मा. विधानसभा/ विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
१०. महालेखापा ½ (लेखापरिक्षा), मुंबई/ नागपूर
११. जिल्हा कोषागार अधिकारी , बुलढाणा.
१२. जिल्हाधिकारी बुलढाणा.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा.
१४. जिल्हा नियोजन अधिकारी, बुलढाणा.
१५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा.
१६. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती.